# वार्तापत्र

कार्यालय पोलीस अधीक्षक,
गडचिरोली दि. २१/०९/२०१७

## नक्षलवादयांनी लावलेले बॅनर जाळून गावकऱ्यांनी केला नक्षलवादाचा जोरदार निषेध

आज दिनांक २१/०९/२०१७ रोजी सिरोंचा तालुक्यातील तमंदला गावातील गावकऱ्यांनी एकजुटीने निर्धार करुन नक्षलवादयांनी लावलेले लोकशाही विरोधी, नक्षल समर्थनाचे बॅनर स्वत: काढून रस्त्यावर टाकून जाळले.

सिरोंचा तालुक्यातील अहेरी- सिरोंचा रस्त्यावरील तमंदला गावाच्या फाटयाजवळ रोडच्या बाजुला नक्षलवादयांकडून बॅनर लावण्यात आले होते. आज नक्षलवादयांनी लावलेले बॅनर जाळून टाकत तमंदला गाव व परीसरातील नागरिकांनी नक्षल चळवळीचा तीव्र निषेध केला. जे नक्षलवादी आपल्या आदिवासी बांधवांची हत्या करतात, जे आपल्या भागाच्या विकासाला विरोध करतात अशा नक्षल चळवळीला आता आम्ही प्रतिसाद देणार नाही, असे आदिवासी दुर्गम भागातील गावकऱ्यांनी एकजुटीने निर्धार करुन नक्षल्यांविरोधात जोरदार घोषणा बाजी करीत नक्षलवादयांनी लावलेले बॅनर जाळले.

पोलीस हे जनतेच्या समस्या जाणुन घेवून त्या सोडविण्यासाठी करत असलेले प्रयत्न आणि विविध सामाजिक उपक्रम राबवून केलेले जागृती यातून सर्वसामान्य जनमानसांपासुन नक्षल्यांपर्यंत सर्वांनाच नक्षल चळवळीचा फोलपणा लक्षात आला आहे. यामुळेच आता गावकरी एकत्र येवून नक्षलवादयांविरोधात आवाज उठवित आहेत



# वार्तापत्र

1

कार्यालय पोलीस अधीक्षक
दिनांक २१/०९/२०१७

आज दिनांक २१/०९/२०१७ रोजी गडचिरोली येथील फुले- आंबेडकर कॉलेज ऑफ सोशल वर्क, गडचिरोली व स्थानिक गुन्हे शाखा, पोलीस अधिक्षक कार्यालय गडचिरोली यांच्या संयुक्त विद्यमानाने सोशल मिडीया/ इंटरनेट व्दारे होणारी फसवणूक व महिला विषयक कायदे या विषयावर एक दिवशीय कार्यशाळा आयोजित करण्यात आली.

सदर कार्यशाळेस प्रदिप लांडे पोलीस निरीक्षक, स्थानिक गुन्हे शाखा, महिला पोलीस उपनिरीक्षक समु राकिशोर चौधरी महिला सेल, पोलीस उपनिरीक्षक अविनाश ढमे, सायबर सेल यांनी पुढील विषयावर संभाषण केले आहे. नविन तंत्रज्ञान/गॅजेटचा वापर करतानां कोणती काळजी घेतली पाहिजे तसेच महिलांच्या सुरक्षिततेच्या दृष्टिने काय उपाययोजना केलेल्या आहेत. तसेच स्थागुशा शाखेचे महिला सेलतर्फे राबविण्यात येणारे उपक्रम, प्रतिसाद ॲप, दामीनी पथक, महिला हेल्पलाईन टोल फ्री क्रमांक १०९१ या विषयी सविस्तर मार्गदर्शन केले.

हा उपक्रम संपूर्ण जिल्हयात राबवून विद्यार्थ्यांमार्फत संपूर्ण जिल्हयात इतर नागरिकांना जागृत करण्याचा मा. पोलीस अधिक्षक, गडचिरोली यांचा मानस आहे असे सांगितले.

सदर कार्यक्रम फूले आंबेडकर कॉलेज ऑफ सोशल वर्क, गडचिरोली चे प्राचार्य डॉ. सुरेश खंदार व डॉ. दिलीप बारसागडे यांच्या सहकार्याने राबविण्यात आले असून सदर कार्यक्रमाचे संचालन महिला महाविद्यालयांच्या प्राध्यापिका डॉ. प्रज्ञा वनमाळी यांनी केले असून कुमारी भूमिका कामकवार या विद्यार्थीनीने आभार प्रदर्शन कले आहे.

